# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
# सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण विभाग,

कोंकण भवन, खोली क्र.५०६, पाचवा मजला, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

कार्यालय दूरध्वनी :- २७ ५८ ०३ २१ E-Mail :- jd.konkan@mahakosh.in


---

क्र.ससंलेको/कोवि/आस्था/टि.स.२/न.क्र.१७(३)/२०२० दिनांक : 04 MAR 2020

प्रति,

----------------

----------------

----------------

विषय : बाहययंत्रणेव्दारे वाहनचालकांच्या सेवा घेण्याबाबत.

संदर्भ : १. शासन वित्त विभाग पत्र क्र.सेवाप्र-२०१३/प्र.क्र.१८५/कोषा (प्रशा-३) दि.२४.१०.२०१८

२. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.०१.१२.२०१६

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग या कार्यालयास दि.०१.०४.२०२० पासून ११ महिन्याच्या कालावधीसाठी बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पदध्तीने वाहनचालक पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्था /बेरोजगार संस्थांकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

तरी संबंधितांनी आपले दरपत्रक या सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे अधिन राहून सोबत जोडलेल्या निविदा / दरपत्रक प्रपत्रात भरुन बंद लिफाफयात दि.०४.०३.२०२० ते दि.११.०३.२०२० पर्यंत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत या कार्यालयास स्वत: सादर करावीत किंवा सदर वेळेत कार्यालयास मिळतील या प्रकारे पोस्ट/कुरीअर सेवेद्वारे पाठवावित. सदर दिनांकानंतर प्राप्त होणारी दरपत्रके दर प्रक्रीयेसाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

सोबत : दरपत्रक नमुना व सर्वसाधारण अटी व शर्ती

(सिताराम काळे)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे, कोकण विभाग,
कोकण भवन, नवी मुंबई.

प्रत : १. सहाय्यक संचालक (ट्रेझरीनेट), लेखा व कोषागारे, मुंबई यांना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिदध करणेसाठी सस्नेह अग्रेषित.

२. कार्यालयाचे नोटीसबोर्ड

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

# सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण विभाग,

कोंकण भवन, खोली क्र.५०६, पाचवा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

कार्यालय दूरध्वनी : २७५८०३२१ e- mail : jd.konkan@mahakosh.in

---

**बाह्ययंत्रणे मार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थाकडून दरपत्रक मागविणेबाबत.**

सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई कार्यालयाचे वाहनांकरिता एक वाहनचालक भरण्यासाठी बाह्ययंत्रणेमार्फत वाहनचालक पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल,बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकरिता तसेच आवश्यक अटी,शर्ती इ.विषयक तपशिल पुढील प्रमाणे आहे.

अ. पक्षकार :- करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे) आणि सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई हे राहतील.

ब.वाहनचालक उमेदवारांसाठी अटी व शर्ती.

| | |
|---|---|
| १ | प्रादेशिक परिवहन अधिकारी,यांनी संबंधित उमेदवारास जारी केलेले एच.एम.व्ही./एल.एम.व्ही. वाहन चालविण्याची मूळ अनुज्ञप्तीपत्र/परवाना (Driving License) |
| २ | उमेदवार वाहन चालविण्यासाठी मानसिक/शारीरीकदृष्टया पात्र असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. |
| ३ | उमेदवारास L.M.V.वाहन चालविण्याचा किमान ३वर्षांचा अनुभव असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र. (खाजगी व्यक्तिंकडे काम केल्याचे प्रमाणपत्र चालणार नाही.) |
| ४ | उमेदवार किमान १०वी उत्तीर्ण असावा. |
| ५ | दिनांक ३१.०३.२०२० रोजी उमेदवाराचे वय हे ५० वर्षापेक्षा जास्त नसावे व १८ वर्षापेक्षा कमी नसावे |
| ६ | उमेदवारास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी. |
| ७ | उमेदवार निर्व्यसनी असावा. |
| ८ | उमेदवारास वाहन दुरुस्तीची प्राथमिक माहिती असावी |
| ९ | वाहनचालकाची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता,कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी , अलिकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ व बँक खात्याचा तपशिल |

क. कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी

| | |
|---|---|
| १ | वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी नऊ तास राहील. |
| २ | संचालक/सहसंचालक हे ज्यावेळी कामावर बोलावतील त्यावेळेस तत्परतेने कामावर यावे लागेल. |
| ३ | आवश्यकता भासल्यास सुट्टीच्या दिवशीही कामावर बोलावण्याचा अधिकार सहसंचालक यांना असेल. सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून वेगळे पारिश्रमिक भत्ते मागता येणार नाहीत. |
| ४ | वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी असेल. |
| ५ | कंत्राटी वाहनचालकाचे कार्यक्षेत्र हे कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांचे भौगोलिक क्षेत्र असेल, शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास विभागा बाहेरील जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्रात वाहन चालवावे लागेल. |

ड. वाहनचालकाला अनुज्ञेय असणारे पारिश्रमिक, भत्ते व त्यांचेप्रदान :

| | |
|---|---|
| १ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या कामगारास अदा करावयाच्या पारिश्रमिकाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + राज्य कामगार विमा योजना + कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम इत्यादी मिळून होणारी रक्कम यापेक्षा कमी असणार नाही. कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या प्रशासकीय सेवेचा (Administrative Service Charges) स्वतंत्रपणे दर्शवावे. |
| २ | वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी नऊ तास राहील. या व्यतिरिक्त पुढे काम झाल्यानंतर शासन निर्णय वित्त विभाग,दिनांक ९.९.२०११ अन्वये निर्धारित केलेल्या प्रचलित दराप्रमाणे अतिकालिक भत्ता लागू राहील.सध्या अतिकालिक भत्त्याचे दर पुढील प्रमाणे आहेत. |
| ३ | कामाच्या दिवशी /रविवार /सुट्टीच्या दिवशी ९ तासांपेक्षा (भोजन समय धरुन) जास्त काम झाल्यास त्या पुढे प्रति तास रु.४०/-भत्त्याचा दर असून,अर्धा तास व त्यापुढील कामासाठी तो पूर्ण तास गणण्यात येईल. वाहनचालकास एका महिन्यात मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या पगाराच्या ५०% पेक्षा जास्त असणार नाही. |
| ४ | महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयात कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल. |
| ५ | वाहनचालकाचे मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित वाहनचालकाच्या बँकखात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque)/NEFT/ECS व्दारे जमा करणे आवश्यक राहील. |
| ६ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकाला दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या धनादेशाची छायांकीत प्रत दरमहा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. |
| ७ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकांना किमान वेतन कायद्यातील तरतूदी पेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल. |
| ८ | कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST)कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची /वस्तु व सेवा कराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. |
| ९ | व्यवसायकर भरण्याची जवाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादारयांचे राहील. |

इ. निविदेसंबंधीच्या अटी व शर्ती :

१) निविदा दोन लिफाफा पद्धतीने सादर कराव्या लागतील.तांत्रिक लिफाफा वदराचा लिफाफा.

अ. तांत्रिक लिफाफा

तांत्रिक लिफाफयामध्येखालील कागदपत्रे आवश्यक असतील:

| | |
|---|---|
| १ | सबंधित संस्था /अर्जदार ही खालील पैकी एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी.(नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)<br>• मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम,<br>• भागीदारी संस्था अधिनियम,<br>• सहकारी संस्था अधिनियम<br>• कंपनी अधिनियम |
| २ | दरपत्रक अर्जासोबत अनामत रक्कम रु.५,०००/- धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) लेखा अधिकारी, सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे नावाने देण्यात यावा. |
| ३ | दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल.यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ४ | वस्तु व सेवा कर कायद्यानुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे. |
| ५ | बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वाहनचालकांना मासिक पारिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस या संचालनालयास प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल.तसेच वाहनचालकांच्या वेतनातून EPF अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. |
| ६ | मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना वाहनचालक कंत्राटी तत्वावर पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. |
| ७ | संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील दोन वर्षासाठी सरासरी दहा लाखापेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षांच्या ताळेबंदाच्या प्रती निवदा अर्जासोबत जोडण्यात यावात. |

ब) दराचा लिफाफा.

सदरच्या लिफाफयामध्ये सोबत जोडल्याप्रमाणे दरपत्रक सादर करण्यात यावे.

| | |
|---|---|
| १ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधी पर्यंत वैध / विधीग्राहय असतील. |
| २ | दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील.तांत्रिक दरपत्रकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील. |
| ३ | तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील. |
| ४ | प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत. |
| ५ | पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपरवर करार नामा करुन देणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| ६ | निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास तात्काळ सुरक्षा ठेव (Performance Security) रुपये १०,०००/- चा धनाकर्ष (मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा ) लेखा अधिकारी, सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे नावे द्यावा लागेल.करार नाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास ,करार नाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल. |
| ७ | कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षाठेवीची रक्कम जप्त केली जाईल. |
| ८ | कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दरकराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही. |
| ९ | सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदा धारकास १ महिन्याची आगाऊ नोटीस देवून करार नामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. |

**ई . बाह्ययंत्रणे मार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती**

| | |
|---|---|
| १ | वाहन चालक उमेदवाराची सेवा चालू ठेवण्याचे/संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे स्वाधीन राहतील. |
| २ | वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचे काही नुकसान झाल्यास संस्थेस त्याच्या दुरुस्तीचा खर्च करावा लागेल. तसेच दुर्देवाने वाहनचालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास त्याच्या वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही उत्तरदायित्व हे या सहसंचालकांकडे राहणार नाही. त्याची पूर्णत: जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. |
| ३ | वाहनचालक वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |
| ४ | वाहनचालक रजेवर असल्यास पर्यायी वाहनचालक पुरविणे बंधनकारक राहील. |
| ५ | वाहनचालक उमेदवारास कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांचे भौगोलिक क्षेत्राचे व विभागाबाहेरील जिल्हयांचे भौगोलिक क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक. |
| ६ | उमेदवाराच्या सचोटी/चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल. |
| ७ | कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे/न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणेबंधन कारक. |
| ८ | कोणतीही ई-निविदा स्विकारण्याचा किंवा एखादी अथवा सर्वच ई-निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क सहसंचालक,लेखा व कोषागारे, कोकण विभाग, नवी मुंबई यांना राहील. |

वर नमूद अटी व शर्तींची[(अ)व(ब)]पूर्तता करणाऱ्या संस्थाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रक दिनांक ०४.०३.२०२० ते दिनांक ११.०३.२०२० या कालावधीत (सार्वजनिक सुटटी वगळून) सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकणभवन, नवी मुंबई, बेलापूर या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ पर्यंत स्विकारले जातील.

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : -----------

सहसंचालक,
लेखा व कोषागारे, कोकण विभाग,
कोकणभवन, नवी मुंबई.

निविदा / दरपत्रके प्रपत्र

पुरवठादाराचे नाव:-

| अ.क्र. | बाब | कुशल कामगारासाठी दर (प्रतिमाह) रुपयामध्ये |
|---|---|---|
| १ | मुळ वेतन Basic Pay | |
| २ | विशेष भत्ता (Special Allowance) | |
| ३ | कामगार कायद्यातील तरतूदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम.जसे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजना, निवृत्ती वेतन निधी, कर्मचारी कल्याण निधी, व्यवसायकर इत्यादी. | |
| ४ | कंत्राटदार / पुरवठादाराचे प्रशासनिक सेवाखर्च (Firms Administrative Service Charges) | |
| | एकूण | |

अक्षरी रक्कम रूपये ------------------------------------------------------------

ठिकाण:-

दिनांक:-स्वाक्षरी

वरील पैकी बाब क्रमांक ०१ व ०२ चे संदर्भात राज्य शासनाने कुशल कामगारासाठी निश्चित केलेल्या अद्यावत अस्तित्वात असलेल्या दरांची प्रत जोडणे आवश्यक राहील.अ.क्र.३ चे बाबतीत संबंधीत कायद्यात तरतूदीनुसार दिलेले दराचे आदेश जोडणे आवश्यक आहे.